# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.१३५३/२०२२/अहिल्यानगर मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री.नारायण नवनाथ साबळे,<br>रा.मु.पो.धायतडकवाडी,<br>ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, अकोला.<br>ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर. | सहाय्यक गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, पाथर्डी.<br>ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर. |

**विवेचन**

उपरोक्त द्वितीय अपिलातील दि.२२/०६/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये १) ग्रामपंचायतीने सन दि.०१/०१/२०१५ ते दि.३१/१२/२०२० दरम्यान कोणकोणती विकास कामे केली? विकास कामांची यादी द्यावी. या विकास कामांसाठी केंद्र सरकार, राज्य सरकारच्या कोणत्या योजनेतून किती निधी मिळाला. सदर निधी कधी व कसा खर्च करण्यात आला. २) अकोला ग्रामपंचायतीच्या मागील चार वर्षाच्या ऑडीट रिपोर्टची छायांकित प्रत द्यावी. ३) ग्रामपंचायतीमध्ये एकूण किती कर्मचारी आहेत. त्यांना किती व केव्हापासून मासिक वेतन दिले जाते याचा तपशिल द्यावा. ४) ग्रामपंचायतीला सन २०१५ ते २०२० या पाच वर्षात प्रति वर्षी कोणकोणत्या उद्देशासाठी शासनाकडून किती रुपये थेट अनुदान किंवा मदत मिळाली. या मिळालेल्या रकमेचा विनियोग कोठे केव्हा व कसा झाला. ५) २०१५ ते २०२० अखेरपर्यंत ग्रामपंचायतीच्या किती ग्रामसभा भरवल्या गेल्या. प्रत्येक ग्रामसभेला उपस्थित सर्व सदस्यांची नावे व पत्ते मिळावेत. ग्रामसभेत मंजूर झालेल्या सर्व ठरावांची नक्कल प्रती मिळाव्यात अशी माहिती अपिलार्थी यांनी मागितली आहे. सदर द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दि.१६/०६/२०२५ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, अकोला ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर (श्री.बाळासाहेब तिडके) यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसांत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी."

२. उपरोक्त द्वितीय अपिल प्रकरणी आयोगासमोर दि.१६/०६/२०२५ रोजी सुनावणीवेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, अकोला ता.पाथर्डी हे ऑनलाईन उपस्थित असल्याचे दिसून येते. तरीदेखील आयोगाच्या उपरोक्त नमूद आदेशाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, अकोला ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर (श्री.बाळासाहेब तिडके) यांनी आयोगाकडे अद्यापपर्यंत कोणताही लेखी खुलासा सादर केल्याचे दिसून येत नाही. यावरुन त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कोणतेही गांभीर्य नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, अकोला ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर (श्री.बाळासाहेब तिडके) यांच्याविरुध्द आयोगाच्या मते उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पाथर्डी ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर यांनी त्यांच्या वेतनातून समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **"००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)"** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.१३५३/२०२२/अहिल्यानगर अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

जावक क्र. e293 दिनांक :- 08 DEC 2025